**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत रोपवन संरक्षण व संगोपनाबाबत. मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्र. मग्रारो-२०११/प्र.क्र.२८/रोहयो-१
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२
दिनांक ३० जून, २०११.

वाचा:- १) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा-२००५
२) शासन निर्णय नियोजन विभाग क्र.रोहयो-२००५/प्र.क्र.१९४/रोहयो-१०, दि.२३ डिसेंबर,२००५
३) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम (सुधारित) कायदा - २००६
४) शासन निर्णय नियोजन विभाग (रोहयो प्रभाग), क्र.मग्रारो-२०१०/प्र.क्र.३५/रोहयो-१ दि.९ डिसेंबर,२०१० व क्र.मग्रारो-२०११/प्र.क्र.२८/रोहयो-१ दि.१० मे,२०११
५) शासन निर्णय नियोजन विभाग(रोहयो प्रभाग) क्र.मग्रारो-२०१०/प्र.क्र.११४/रोहयो-१ दि.२२ फेब्रुवारी,२०११ व क्र.मग्रारो-२०११/प्र.क्र.२८/रोहयो-१ दि. ९ मे,२०११
६) प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, म.रा. पुणे यांचे दि.२८-६-२०११ चे पत्र

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम,२००५ अंतर्गत राज्यामध्ये मग्रारोहयो टप्याटप्प्याने सुरु करण्यात आली असून, दिनांक १ एप्रिल,२००८ पासून संपूर्ण राज्यामध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यानुसार संदर्भीय शासन निर्णय दिनांक २३ डिसेंबर,२००५ मधील अनुज्ञेय कामात रोपवाटिका व वृक्षलागवड इत्यादींचा समावेश आहे. संदर्भीय अधिनियमातील अनुसुचि १ मध्ये अनुज्ञेय कामात वनीकरण व झाडे लावणे (Afforestation and tree planting) यांना प्राथमिकता दिलेली आहे.

२. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने उपरोक्त क्र. ४ व ५ प्रमाणे शासन निर्णय निर्गमित केले. सदर शासन निर्णयात रोपवन संगोपन, देखभाल व संरक्षण याकरीता पारंपारीक पध्दत नमुद करण्यात आली आहे. यामध्ये रोपवन / वृक्षारोपणाच्या संरक्षणासाठी चौकीदाराची तरतूद आहे. मात्र जिवंत रोपांच्या टक्केवारीप्रमाणे मजुरीचे वाटप करण्याची तरतूद नाही.

३. रोपवनाचे संगोपन देखभाल व संरक्षण वेगळया पध्दतीने करुन रोपवनातील जिवंत रोपांची टक्केवारी वाढविणे ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण म.रा.पुणे यांनी संदर्भ क्रमांक ६ अन्वये प्रस्ताव सादर केला आहे. त्या प्रस्तावास अनुसरुन उपरोक्त क्र. ४ व ५ मधील शासन निर्णयातील कामकाजाच्या कार्यप्रणालीत काही बदल करुन नवीन कार्यप्रणाली निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

४. उपरोक्त दिनांक ९-१२-२०१०, दिनांक २२-२-२०११, दिनांक ९ मे २०११ व दि.१० मे २०११ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेली कार्यपध्दती वापरावयाची किंवा सदरहू शासन निर्णयामधील कार्यपध्दती वापरावयाची याबाबत ग्रामपंचायतीस मुभा देण्यात येत आहे. मात्र याबाबत व रोपवनास मोकाट जनावरांपासून धोका असल्याने ग्रामसभेने व ग्रामपंचायतीने मोकाट जनावरे न चारण्याबाबतचा ठराव करणे अनिवार्य राहील

**शासन निर्णय :-**

ग्रामपंचायतीच्या हद्दीत करण्यात येणा-या वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत रोपवनाचे संगोपन, देखभाल व संरक्षण करण्याकरीता खालील कार्यप्रणालीस शासन मान्यता देत आहे.

१) ग्रामपंचायतीच्या ताब्यातील शासकिय जमीनीवर पहिल्या वर्षी करण्यात आलेल्या रोपवनामधील एकूण लागवड करण्यात आलेल्या रोपांचे, २०० रोपांचा एक घटक या प्रमाणे घटक पाडण्यात यावेत. रोपांची संख्या कमी/जास्त असल्यास त्यांचे समान वाटप सर्व घटकांमध्ये करण्यात यावे त्याबाबतची काही उदाहरणे खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | रोपांची संख्या | घटक संख्या | कुटुंब संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २०० | १ | ४ | घटक समप्रमाणात आहे. |
| २ | २५० | १ | ४ | घटकापेक्षा जास्त ५० रोपे सांभाळण्याची जबाबदारी घटकाची व त्यातील ४ कुटुंबाची समप्रमाणात राहील. |
| ३ | ३९० | १ | ४ | घटकापेक्षा जास्त १९० रोपे सांभाळण्याची जबाबदारी घटकाची व त्यातील ४ कुटुंबाची समप्रमाणात राहील. |
| ४ | ४०० | २ | ८ | घटक समप्रमाणात आहे. |
| ५ | ४२५ | २ | ८ | घटकापेक्षा जास्त २५ रोपे संभाळण्याची जबाबदारी दोन घटकाची व त्यातील ८ कुटुंबाची समप्रमाणात राहील. प्रति घटक २१२ रोपे |
| ६ | ६५० | ३ | १२ | घटकापेक्षा जास्त ५० रोपे संभाळण्याची जबाबदारी ३ घटकाची व त्यातील १२ कुटुंबाची समप्रमाणात राहील. प्रति घटक २१६ रोपे |
| ७ | ८०० | ४ | १६ | घटक समप्रमाणात असल्याने प्रत्येक घटकास २०० रोपे. |

टिप - १) २०० रोपे सांभाळल्यास प्रचलित दैनंदिन मजुरी दर (सद्या रु.१२७/- प्रति दिन) अनुज्ञेय राहील.

२) २०० रोपांपेक्षा जास्त रोपांचे संरक्षण केल्यास देखील प्रचलित दैनंदिन मजुरी दर (सद्या रु.१२७/- प्रति दिन) अनुज्ञेय राहील.

घटकांमध्ये वाटप करण्यात आलेल्या रोपांच्या संख्येची आवश्यक ती नोंद घेऊन अभिलेख तयार करणे अनिवार्य राहील.

**२) संगोपनाचा कालावधी :-**

या योजनेअंतर्गत ४ कुटुंबाचा एक गट हा २०० रोपांच्या एका घटकाची देखभाल, संगोपन व संरक्षण २ वर्ष ९ महिने कालावधीसाठी करतील. प्रथम वर्षी जुलै ते मार्च असे ९ महिने, व्दितीय व तृतीय वर्षी प्रत्येकी १२ महिने याप्रमाणे दोन वर्षे ९ महिने कालावधी राहील.

**३) कुटूंबांच्या गटाची निवड :-**

प्रत्येक घटकातील रोपांच्या देखभाल, संगोपन व संरक्षणाकरिता ४ कुटूंबांचा एक गट या प्रमाणे गटांची निवड ग्रामसभेने करावी. गटाची निवड करतांना वयोवृध्द, विधवा, शारिरीकदृष्टया कमजोर, भूमिहीन, इत्यादी कुटूंबांना प्राधान्य देण्यात यावे.

**४) कुटूंबाच्या गटाची कामे व जबाबदारी :-**

सदरहू योजनेअंतर्गत रोपांची निंदणी करणे, मरळी भरणे, खते देणे व रोपांभोवती काटेरी कुंपण करणे ही कामे घटकातील सर्व कुटुंबानी एकत्रितरित्या करावयाची आहे. मात्र रोपांच्या संरक्षणांचे काम, रोपांना आवश्यकतेनुसार पाणी देण्याचे काम तसेच काटेरी कुंपणाची दुरुस्ती व देखभालीचे काम घटकातील कुटुंबांना चक्रीय पध्दतीने करणे आवश्यक राहील.

रोपांची निंदणी करणे, रोपांना आवश्यकतेनुसार वेळोवेळी पाणी देणे, रोपांचे मोकाट जनावरे, आग इत्यादी धोक्यांपासून संरक्षण करणे, रोपांना खते देणे, रोपांभोवती काटेरी कुंपण करणे व त्याची देखभाल करणे, तसेच रोपांच्या वाढीसाठी व संरक्षणासाठी जे जे आवश्यक आहे ते काम करणे प्रत्येक कुटुंबास आवश्यक राहील. कुटुंबाने करावयाच्या कामांबाबतचा सविस्तर तपशील परिशिष्ट भाग-१ ब मध्ये देण्यात आला आहे.

**५) कुटूंबांना मजुरी देणे :-**

संरक्षक कुटूंबाला मजूरीचे वाटप प्रत्येक आठवडयात करण्यात यावे. प्रत्येक आठवडयाची देय मजुरी ही घटकातील जिवंत रोपांच्या टक्केवारीशी खालील प्रमाणे निगडीत राहील.

अ) जिवंत रोपांची टक्केवारी ७५% किंवा जास्ती असल्यास आठवडयाची पूर्ण मजूरी देण्यात येईल.

ब) जिवंत रोपांची टक्केवारी ६०% ते ७४% असल्यास निम्मी मजुरी (५०%) देय राहील.

क) जिवंत रोपांची टक्केवारी ६०% पेक्षा कमी राहिल्यास मजुरी देय राहणार नाही.

**६) मजुरीचे निकष :-**

प्रत्येक कुटुंबाने सात दिवस काम केले असल्याचे गृहीत धरण्यात येईल. संरक्षणाचे काम असल्यामुळे इतर कामांप्रमाणे सहा दिवस काम व एक दिवस सुट्टी असे निकष या कामास लागू होणार नाही. सात दिवस झाल्यानंतर ग्राम रोजगार सेवक / ग्रामसेवक यांच्या समक्ष घटकातील रोपांची मोजणी करण्यात येवून त्याबाबतच्या नोंदी घेवून, हजेरीपत्रकावर जिवंत रोपांची टक्केवारी नमूद करुन उपरोक्त परिच्छेद ५ प्रमाणे जिवंत रोपांच्या टक्केवारीनुसार मजूरी अदा करण्यात येईल. त्यानंतर ती रोपे (घटक) दुस-या कुटंबाकडे हस्तांतरीत करण्यात येईल.

**७) रोजगाराची गणना :-**

२०० रोपे सांभाळण्याकरिता ४ कुटूंबाच्या एका गटासाठी तीन वर्षासाठी मग्रारोहयो मध्ये खालीलप्रमाणे रोजगार उपलब्ध होईल.

अ) पहिले वर्ष - २७० दिवस / ४ कुटुंब म्हणजेच ६८ मनुष्य दिवस प्रति कुटुंब.

ब) दुसरे व तिसरे वर्ष ३६५ दिवस/४ कुटुंब म्हणजेच ९१ मनुष्य दिवस प्रति कुटुंब प्रति वर्ष.

**८) कुटूंबाची पात्रता :-**

ज्या गटातील कुटूंबाच्या संरक्षण कालावधीत जीवंत रोपांची टक्केवारी ६०% पेक्षा कमी आहे अशा कुटूंबांला त्या गटातून वगळण्यात यावे व त्यांच्या जागी नवीन कुटूबाची निवड ग्रामसभेमध्ये करण्यात यावी.

**९) नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान :-**

नैसर्गिक कारणामुळे ( रोग,किडी इ. ) रोपांची मरअळ झाल्यास संरक्षक कुटूंबाना पूर्ण मजुरी देय होईल. त्याकरीता सामाजिक वनीकरण विभाग किंवा पंचायत समितीच्या कृषी अधिका-यांनी नैसर्गिक कारणामुळे रोपांची मरअळ झाल्याचे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

**१०) रोपांच्या हानीबाबतचा अहवाल :-**

संरक्षणा अभावी झालेली मरअळ ही संरक्षक कुटूंबाच्या नियंत्रणाबाहेरील घटनेमुळे झाली असल्यास त्याबाबतची शहानिशा सामाजिक वनीकरण विभाग किंवा पंचायत समितीच्या कृषी अधिका-यांनी पहाणी करुन अहवाल दिल्यास, संरक्षण कुटुंबास पूर्ण मजूरी देय राहील.

**११) रोपांची पुनर्लागवड :-**

नैसर्गिक अथवा सरक्षणाअभावी मेलेल्या रोपांच्या पुनर्लागवडीसाठी ग्रामपंचायतीमार्फत रोपे उपलब्ध करुन देण्यात येतील व ती रोपे लागवड करण्याची जबाबदारी संबंधीत संरक्षक कुटूंबाची राहिल.

**१२)अभिलेख :-**

घटकांचे व निवडलेल्या गटांचे अभिलेख ग्रामपंचायत स्तरावर ठेवण्यात यावा, तसेच जागेवर घटकांप्रमाणे सिमांकन करावे.

**१३)कामकाजाचे दरपत्रक :-**

कामकाजाचे नमुना दरपत्रक सोबतच्या परिशिष्टात देण्यात आले आहे. त्यानुसार २०० रोपांच्या एका घटकासाठी रु.१,७२,९१८/- इतकी रक्कम अनुज्ञेय आहे. प्रतिरोप रु.८६५/- खर्च आहे, त्यापैकी तीन वर्ष देखभाल, संगोपन व संरक्षण यासाठी मजूरीचा खर्च रु.६३५/- आहे. २०० रोपांना येणारा मजूरीचा खर्च प्रथम वर्षासाठी प्रतिरोप रु.१७१/-, दुस-या वर्षी प्रतिरोप रु.२३२/- व तीस-या वर्षी रु.२३२/- आहे. परिच्छेद क्र. १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे घटकामध्ये २०० पेक्षा जास्त रोपांची लागवड केली तरीही मजुरीवरील खर्च वरीलप्रमाणेच राहील.

ग्रामपंचायतीमार्फत करावयाची कामे परिशिष्टातील भाग १ अ मध्ये नमुद करण्यात आली आहे. तसेच घटकातील कुटुंबांनी करावयाची कामे परिशिष्टाती भाग १ ब मध्ये नमुद करण्यात आली आहे.

१४) **तांत्रिक व प्रशासकीय मान्यता -**

संदर्भ क्र. ४ व ५ मधील शासन निर्णयात नमुद तांत्रिक मान्यतेचे अधिकार पुर्वीप्रमाणेच राहतील.

प्रशासकीय मान्यतेचे अधिकार, ग्राम पंचायतीचे काम असल्याने गट विकास अधिकारी यांचेकडे राहतील.

डिसेंबर २०१० नंतर वनीकरणाच्या कामांना तांत्रिक / प्रशासकीय मान्यता प्राप्त केली असल्यास व त्यात नवीन पध्दतीने / सदरहू शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावयाची झाल्यास पुर्वीचे अंदाजपत्रक सुधारीत करण्यात यावे.

१५) **राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या सर्व मार्गदर्शक सुचनांचे पालन -**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या सर्व मार्गदर्शक सुचना जसे ग्रामसभा व ग्रामपंचायत ठराव, जॉबकार्ड, बँक अथवा पोस्टाव्दारे मजूरी अदा करणे, कंत्राटदारामार्फत कामे न करणे व १५ दिवसामध्ये मजूरी अदा करणे इत्यादी तदनुषंगिक सर्व अटींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१६) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०११०६३०१५०७५९००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( व्ही.गिरीराज )

**प्रधान सचिव (रोहयो)**

प्रति,

मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
सर्व अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त.
आयुक्त (कृषि),महाराष्ट्र राज्य, पुणे.
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे.
प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
उप सचिव (रोहयो समिती), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी (बृहन्मुंबई वगळून).

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद.
सर्व अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
महासंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई. (प्रसिध्दी करीता),
विभागीय कृषि सहसंचालक,ठाणे,पुणे,कोल्हापूर,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर, लातूर.
सर्व अधीक्षक कृषि अधिकारी,
सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्त, नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक/पुणे/कोंकण वृत्त ठाणे.
सर्व मुख्य वन संरक्षक/सर्व उप वनसंरक्षक.
सर्व विभागीय वन संरक्षक/सर्व विभागीय मृदसंधारण अधिकारी.
सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग.
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व कार्यासन अधिकारी, रोहयो प्रभाग व जलसंधारण विभाग.
निवडनस्ती / सारग्रंथ रोहयो-१

## परिशिष्ट

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्र राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कार्यक्रम** | | | | | |
| गावठाण,शाळेचे प्रांगण,मंदिर परिसर,बाजार परिसर,विहिरीचे जवळ,कार्यालय,स्मशान परिसर व ग्रामपंचायत हद्दीतील इतर उपलब्ध जागा, अंतर्गत रस्ते,जोडरस्ते इत्यादी ठिकाणी जास्तीत जास्त २०० उंच रोपे ( अठरा महिने वयोमानाची ) लागवड करणे. | | | | | |
| २०० रोपांसाठी एक घटक | | | | | |
| **खड्डे - ०.६० X ०.६० X ०.६० मी.आकारमानाचे** | | | | | |
| दोन रोपांतील अंतर कमीत कमी ४ मीटर असावे. | | | | | |
| **भाग- १ अ** | | | | | |
| अ | **ग्रामपंचायतीमार्फत करावयाची कामे** | दैनंदिन मजुरीचा दर रु.१२७/- | | | |
| अ.क्र | तपशील | मनुष्य दिन | मजुरी | सामुग्री | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| अ-१ | **लागवड पूर्व कामे** | | | | |
| १ | सर्वेक्षण व सिमांकन- ०.०३ म.दिन प्रति ५० खड्डे | ०.६० | ७६.२० | ०.०० | ७६.२० |
| २ | ३२०० चौ.मी. मधील ४X४ मी. अंतरावर रोपे लावण्यापुर्वी जागेची साफसफाई, खुंट काढणे, नैसर्गीक रोपांची सिंगलिंग करणे इत्यादी एकुण क्षेत्राच्या २५% भाग गृहित धरुन ८०० चौ.मी. दर रु. २.९० प्रती चौ. मी. प्रमाणे. | १८.२६ | २३२०.०० | - | २३२०.०० |
| ३ | खड्डे आखणी करणे- २०० खड्डे - ०.१३ म.दिन प्रति ५० खड्डे-सा.पु.रु.२.२४ प्रति ५० खड्डे | ०.५२ | ६६.०४ | ८.९६ | ७५.०० |
| ४ | खड्डे खोदणे,आकार ०.६०X०.६०X०.६० मी. एकूण खड्डे २००- ७.६८ म.दिन प्रति ५० खड्डे | ३०.७२ | ३९०१.४४ | ०.०० | ३९०१.४४ |
| | **एकूण** | ५०.१० | ६३६३.६८ | ८.९६ | ६३७२.६४ |
| | मजुर कल्याण खर्च २.७० % | | | | १७२.०६ |
| | आकस्मिक खर्च २ % | | | | १२७.४५ |
| | **एकंदर एकूण** | ५०.१० | ६३६३.६८ | ८.९६ | ६६७२.१५ |
| अ-२ | **प्रथम वर्ष कामे** | | | | |
| १ | ०.६० X ०.६० X०.६० मी.आकाराचे २०० खड्डे सभोवतालच्या चांगल्या मातीने भरणे.भरतेवेळी खड्ड्यात कंपोस्ट/शेणखत, सिंगल सुपर फॉस्फेट व आवश्यकतेनुसार लिंडेन, बुरशीनाशके/किटकनाशके प्रत्येक खड्ड्यात टाकणे.२.५ म.दिन प्रमाणे प्रति ५० खड्ड्यांसाठी | १०.०० | १२७०.०० | ४००.०० | १६७०.०० |
| २ | अठरा महिने वयोमानाची निवडक रोपे खरेदी करणे, २२० उंच रोपे त्यापैकी ७०% रोपे शोभिवंत व सावली देणाऱ्या प्रजाती व ३० % रोपे फळझाडे तसेच निवडक व धार्मिक महत्व असलेले वृक्ष याप्रमाणे प्रति रोप रु.५०/- | ०.०० | ०.०० | ११०००.०० | ११०००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | रोपवाटिकेपासून रोपवन क्षेत्रापर्यंत २२० रोपांची भरणी, वाहतुक व रोपे लागवडीच्या जागेवर ठिकठिकाणी उतरवून ठेवणे. १ म.दिन ५५ रोपांना व सा.पु रु.३००/- प्रति ५५ रोपांसाठी | ४.०० | ५०८.०० | १२००.०० | १७०८.०० |
| ४ | २०० रोपांची लागवड करणे. २.०१ म.दिन ५० रोपांसाठी | ८.०४ | १०२१.०८ | ०.०० | १०२१.०८ |
| ५ | प्रत्येक रोपांसभोवती काटेरी फांद्यांचे कुंपण करणे व आवश्यकतेनुसार त्याची दुरुस्ती करणे. | ०.०० | ०.०० | १४०६.०० | १४०६.०० |
| ६ | निंदणीचे वेळी द्यावयाचे खत खरेदी | ०.०० | ०.०० | ९०.०० | ९०.०० |
| ७ | आवश्यकतेनुसार २०० रोपांना प्रति रोप ३ दिवसाला १ लिटर याप्रमाणे दर महिन्याला १० वेळा पाणी देणे. ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी, फेब्रूवारी, मार्च. २०० बॉटल २ रु. प्रमाणे व २ ड्रम १५० रु. प्रमाणे. | - | - | ४३००.०० | ४३००.०० |
| | **एकूण** | २२.०४ | २७९९.०८ | १८३९६.०० | २११९५.०८ |
| | मजुर कल्याण खर्च २.७० % | | | | ५७२.२७ |
| | आकस्मिक खर्च २ % | | | | ४२३.९० |
| | **एकंदर एकूण** | २२.०४ | २७९९.०८ | १८३९६.०० | २२१९१.२५ |
| अ-३ | द्वितीय वर्ष कामे | | | | |
| १ | निंदणीचे वेळी द्यावयाचे खत खरेदी | ०.०० | ०.०० | ९०.०० | ९०.०० |
| २ | आवश्यकतेनुसार २०० रोपांना प्रति रोप ३ दिवसाला १ लिटर याप्रमाणे दर महिन्याला १० वेळा पाणी देणे. एप्रिल, मे, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी, फेब्रूवारी, मार्च. २०० बॉटल २ रु. प्रमाणे | - | - | ५२००.०० | ५२००.०० |
| | **एकूण** | ०.०० | ०.०० | ५२९०.०० | ५२९०.०० |
| | मजुर कल्याण खर्च २.७० % | | | | १४२.८३ |
| | आकस्मिक खर्च २ % | | | | १०५.८० |
| | **एकंदर एकूण** | ०.०० | ०.०० | ५२९०.०० | ५५३८.६३ |
| अ-४ | तृतीय वर्ष कामे | | | | |
| १ | निंदणीचे वेळी द्यावयाचे खत खरेदी | ०.०० | ०.०० | ९०.०० | ९०.०० |
| २ | आवश्यकतेनुसार २०० रोपांना प्रति रोप ३ दिवसाला १ लिटर याप्रमाणे दर महिन्याला १० वेळा पाणी देणे. एप्रिल, मे, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी, फेब्रूवारी, मार्च. २०० बॉटल २ रु. प्रमाणे | - | - | ५२००.०० | ५२००.०० |
| | **एकूण** | ०.०० | ०.०० | ५२९०.०० | ५२९०.०० |
| | मजुर कल्याण खर्च २.७० % | | | | १४२.८३ |
| | आकस्मिक खर्च २ % | | | | १०५.८० |
| | **एकंदर एकूण** | ०.०० | ०.०० | ५२९०.०० | ५५३८.६३ |
| | **एकूण (अ)** | | | | ३९९४०.६६ |

टीप :- ग्रामपंचायतीने अठरा महिने वयोमानाची रोपे खरेदी ही सामाजिक वनीकरण विभाग/कृषि विभाग/फलोत्पादन विभागाच्या रोपवाटिकेतूनच करावी.तसेच खतांची खरेदी सहकारी सोसायटीकडून करावी.

| | भाग - १ ब | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ब | ४ कुटुंबांमार्फत ( देखभाल ,संगोपन व संरक्षण कामे कालावधी तीन वर्षे ) | | | | |
| अ.क्र. | कामाचा तपशील | म.दिन | मजुरी | साहित्य | एकूण |
| ब-१ | **प्रथम वर्ष कामे** | | | | |
| १ | प्रत्येक रोपांसभोवती काटेरी फांद्यांचे कुंपण करणे व आवश्यकतेनुसार त्याची दुरुस्ती करणे. | | | | |
| २ | मरअळीच्या ठिकाणी १० टक्के (२० रोपे) रोपांची खड्ड्यांमध्ये लागवड करणे. | | | | |
| ३ | २०० रोपांना ३ वेळा निंदणी व माती सैल करुन आळे करणे आणि पाणी देण्यासाठी आळी करुन माती सैल करणे. आवश्यकतेनुसार खते देणे | | | | |
| ४ | गुरेढोरे,मनुष्य,आग यापासून वृक्षलागवडीचे संरक्षण व देखभाल व संगोपन - एप्रिल ते मार्च | २७०.०० | ३४२९०.०० | ०.०० | ३४२९०.०० |
| ५ | २०० रोपांना, प्रति रोप ३ दिवसाला १ लिटर याप्रमाणे दरमहा १० वेळा पाणी देणे. रोपांची लागवड केल्यानंतर पाऊस लांबल्यास आवश्यकतेनुसार रोपांना पाणी देण्यात यावे. तसेच ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत देखिल पाणी दयावे. | | | | |
| | **एकूण** | **२७०.००** | **३४२९०.००** | **०.००** | **३४२९०.००** |
| ब-२ | **द्वितीय वर्ष कामे** | | | | |
| १ | २०० रोपांना ३ वेळा निंदणी व माती सैल करुन आळे करणे आणि पाणी देण्यासाठी आळी करुन माती सैल करणे. आवश्यकतेनुसार खते देणे | | | | |
| २ | गुरेढोरे,मनुष्य,आग यापासून वृक्षलागवडीचे संरक्षण व देखभाल व संगोपन - एप्रिल ते मार्च | ३६५.०० | ४६३५५.०० | ०.०० | ४६३५५.०० |
| ३ | २०० रोपांना, प्रति रोप ३ दिवसाला १ लिटर याप्रमाणे दरमहा १० वेळा पाणी देणे.एप्रिल,मे व ऑक्टोबर ते मार्च | | | | |
| | **एकूण** | **३६५.००** | **४६३५५.००** | **०.००** | **४६३५५.००** |
| ब-३ | **तृतीय वर्ष कामे** | | | | |
| १ | २०० रोपांना ३ वेळा निंदणी व माती सैल करुन आळे करणे आणि पाणी देण्यासाठी आळी करुन माती सैल करणे. आवश्यकतेनुसार खते देणे | ३६५.०० | ४६३५५.०० | ०.०० | ४६३५५.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | गुरेढोरे,मनुष्य,आग यापासून वृक्षलागवडीचे संरक्षण व देखभाल व संगोपन - एप्रिल ते मार्च | | | | |
| ३ | २०० रोपांना, प्रति रोप ३ दिवसाला १ लिटर याप्रमाणे दरमहा १० वेळा पाणी देणे.एप्रिल,मे व ऑक्टोबर ते मार्च | | | | |
| | एकूण | ३६५.०० | ४६३५५.०० | ०.०० | ४६३५५.०० |
| | एकूण | | | | १२७०००.०० |
| | मजुर कल्याण खर्च २.७० % | | | | ३४२९.०० |
| | आकस्मिक खर्च २ % | | | | २५४०.०० |
| | एकूण ( ब ) | | | | १३२९६९.०० |
| | एकंदर एकूण ( अ + ब ) | | | | १७२९०९.६६ |

प्रति रोप खर्च रु.८६५/-